# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि. १७ जून २०२२

### जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३२८/२०२२ भादंविसक १४३,१४७,३२३,३२४,५०४,मुपोकाक ३७(१),(३),१३५ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १६/०६/२०२२ रोजी २२.०० वा मुदगल बगीचा पाथरूट चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०६/२०२२ रोजी ०७.०६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विजय चंद्रकांत धोत्रे,वय-३२ वर्षे, रा- घरनं ५१०,न्यू पाच्छा पेठ, पाथरूट चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) विशाल बाबावाले, २) राजा सत्तारवाले,३) आकाश मैनावाले, ४) सागर पुर्ण नाव माहित नाही, ५) इतर तीन इसम राह- सोलापूर- |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपीत हे वरील ठिकाणी दारु पित बसलेले असताना फिर्यादीने त्यांना येथे दारू का पिता येथे दारू पित जावू नका असे सांगितले असता वरील आरोपीत यांनी फिर्यादीस तेथे खाली पडलेल्या काठीने उजवे डोळयाच्या भुवई जवळ मारले त्यात फिर्यादी जखमी झाला असून रक्तस्त्राव होवू लागला त्यावेळी तेथूनच फिर्यादीचा मित्र पियुष अलकुंटे यास देखील वरील सर्वानी लाथाबुक्यांनी मारून ढकलून दिल्याने त्यास डावे पायास खरचटले व तोंडावर मार लागला म्हणून. तपासः- पोसई बादोले- **९८२३४९९५५६** |

### सलगरवस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १०६/२०२२ भादंविसक ३२४,३२३,५०४,१४३,१४७,१४८,१४९ अनुसुचित जाती व जमाती ३ (१) (आर),३ (१) (एस),३ (२) (५अ) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ११/०६/२०२२ रोजी २०.३० वा. बेलाटी गावातील दर्ग्याच्या मोकळया जागेत सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १६/०६/२०२२ रोजी २०.५६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | श्रीशैल विश्वनाथ कांबळे,वय-३२ वर्षे, रा- घरनं ९६/९७,शुक्रवार पेठ,सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) शिवानंद किसन बंडगर,२) दिपक किसन बंडगर, ३) सचिन प्रकाश ढेपे, ४) सोमनाथ वसंत दोडतले ,५) महावीर नामदेव कोले, ६) विठ्ठल ज्ञानेश्वर मोटे, ७) आनंद ज्ञानेश्वर मोटे, ८) हरी आनंद मोटे रा बेलाटी,ता.उत्तर सोलापूर जि सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, शुभम शेंडगे व सचिन ढेपे यांच्यात भांडण चालले होते, सदर भांडण सोडविण्यासाठी फिर्यादी मध्ये गेलो असता आरोपी क्र१ यांनी फिर्यादीस तु का भांडणामध्ये पडतोस रे म्हणून शिवीगाळी केले तसेच मारहाण करण्यास सुरूवात केली ते पाहून त्यांच्यासोबत असलेले आरोपी क्र २ यांनी बाजूला पडलेल्या बांबू घेऊन फिर्यादीच्या उजव्या कानाच्या वरती डोक्यात बांबूने मारून व आरोपी क्र १ यांनी कुठल्यातरी लोखंडी हत्याराने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या अंगठयाखाली मारून फिर्यादीस जखमी केले तसेच आरोपी क्र ३,४ या दोघांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच आरोपी क्र ५,६,७,८ यांनी फिर्यादीस खाली पाडून मारहाण केली असलेबाबत तसेच आरोपींनी फिर्यादीस जातीवाचक शिवीगाळी करून फिर्यादीचे डोळयात लाल चटई टाकून,लोखंडी सळई,चाकुने डोक्यावर व तळहातावर मारून जखमी केले म्हणून. तपासः- सपोआ विभाग-२,सोलापूर. **९९२२२६६०४८** |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३२९/२०२२ भादवि ४९८ (अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १०/०२/२०१९ ते आज तागायत फिर्यादीचे सासरचे घरी, |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १६/०६/२०२२ रोजी १७.३९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पद्मीनी निखील कोंडा,वय-२७ वर्षे, रा- दिपकमल अपार्टमेंट ए ब्लॉक रू नं २०३,गांधी नगर,अक्कलकोट रोड,सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) निखील श्रीनिवास कोंडा, २) सौ सपना श्रीनिवास कोंडा, ३) श्रीनिवास नरसिंग कोंडा, सर्व रा- २६/३७,विनकर वसाहत एमआयडीसी ,सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत यांनी संगनमत करून वेळोवेळी यातील आरोपी क्र १ हा परस्त्रीशी बोलत असल्याचे फिर्यादीने विचारणा केलेवरून त्यांचा राग मनात धरून फिर्यादीस तु कोण मला विचारणारी मी काही करून शकतो तु घरचे काम करीत जा तसेच आरोपी क्र २ व ३ यांनी तु माझे मुलाबाबत तुझ्या आई वडिलांना काय काय सांगते तुला आम्ही नांदविणार नाही तु माझ्या मुलाचे जिम व्यवसायाकरीता ३० लाख रू घेवून ये असे म्हणून तगादा लावून फिर्यादीस हाताने लाथाबुक्यांनी मारहाण करून शारीरीक व मानसिक त्रास दिला आहे तसेच फिर्यादीस मुलगी झाल्यानंतर तु आमचे खानदानला मुलगा दिलेला नाही तु दारिद्री आहे तु तुझ्या आई वडिलांकडून ३० लाख रू घेवून आली नाही तर तु आताचे आता तुझ्या मुलीला घेवून माहेरी निघून जा जोपर्यत ३० लाख रू घेवून येत नाही तो पर्यत आमचे घरी नांदण्यास येवू नको असे म्हणून फिर्यादीस हाताबुक्यांने मारहाण करून हाकलून दिले आहे म्हणून. तपास:- पोना/११०१/बागवान- ९०२८२४६६९४ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ३१७/२०२२ भादवि ३२३,१४३,१४७,१४९,५०४,५०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि १५/०६/२०२२ रोजी २३.३० वा. दत्ता हॉटेल मड्डी वस्ती, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १६/०६/२०२२ रोजी २३.०६ वा |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | अभिषेक महांतेश भाईकट्टी,वय-१९ वर्षे, रा- १४३,ए,धोत्रेकर वस्ती,भवानी पेठ,सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) मोहित राऊत,२) आकाश बंडगर, ३) रवि सोलनकर, ४) संग्राम निशाणदार, ५) सिद्दबाबा निशानदार, ६) साईनाथ निशानदार सर्व- रा सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत क्र ५ यांचेबरोबर फिर्यादीचे व्हट्सअप चॅटवर झालेल्या वादाबाबत प्रत्यक्ष भेटून वाद मिटविण्यासाठी फिर्यादी गेले असता आरोपी क्र ५ यांचे सोबत असलेले वरील सर्व आरोपीत यांनी फिर्यादीस हाताने व लाथाबुक्याने मारहाण केली तसेच आरोपी क्र ५ ,६,२ यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून तुला सोडणार नाही असे म्हणून दमदाटी केली म्हणून. तपास:- सपोनि पवार- **९८८१९०२६२४** |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ३१५/२०२२ भादवि ३८४,४२७,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि १५/०६/२०२२ रोजी सफारी बार ॲन्ड रेस्टारंट ,भवानी पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १६/०६/२०२२ रोजी ०३.४० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | विजय भास्कर सुरवसे,वय-३५ वर्षे, रा-१३०,उत्तर कसबा,शिवमंदिर जवळ पत्रा तालीम सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) बाळु कुमार बनसोडे,रा-११९, २) अक्षय प्रकाश थोरात, ३) संजय गायकवाड, ४) राकेश चंदनशिवे सर्व रा न्यु बुधवार पेठ सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत मजकूरांनी वरील ठिकाणी येवून दारू,बियर व चकणाची ऑर्डर मागवून घेवून टेबल नं ३ वर दारूचे बाटल्या व बियरचे बाटल्या फोडून वेटर अशोक देवगण व फिर्यादीशी हुज्जत घालून शिवीगाळ,दमदाटी केली तसेच तुला बघुन घेतो अशी धमकी दिली आहे तसेच हॉटेलमधील टेबल,ग्लास बाटल्या,फर्नीचर झाडे लावल्याचे कुंडया यांची तोडफोड करून दहशत निर्माण करून हॉटलेमध्ये इतर बसलेल्या १० ते १५ गिऱ्हाईक सैरावैरा पळून गेले त्यावेळी हॉटेलचे मालक संजय कोळी येवून नमुद आरोपीना तोडफोडीची विचारणा केली व बिल मागीतले असता आरोपी क्र २ याने आम्ही बिल देणार नाही उलट तुला हॉटेल चालवायचे असेल तर मला प्रत्येक महिना ०५ हजार दयावे लागतील तुम्ही पैसे दिले नाही तर पुन्हा पुर्ण हॉटेल मधील सामानाची तोडफोड करेन अशी धमकि देवून बाहेर जात असताना झाडयाचे कुंडया फोडून एकूण अंदाजे १०,०००/- रू चे नुकसान करून मोठ-मोठयाने शिवीगाळ करू लागले त्यामुळे सदर परिसरातील लोक भितीने आपले दुकान बंद करून सैरावैरा पळून गेले आहे म्हणून. तपास:- सपोनि पवार-**९८८१९०२६२४** |

# जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २९३/२०२२ भादवि ४१७,४२० प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ३१/०७/२०२२ ते दि १२/१२/२०२१ चे दरम्यान १४२,भगवान नगर,झोपडपट्टी पोलीस मुख्यालय जवळ,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १६/०६/२०२२ रोजी २०.२१ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | शंकर नारायण फलमारी,वय-४० वर्षे,रा-१४२,भगवान नगर,झोपडपट्टी पोलीस मुख्यालय जवळ,सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | योगेश पुर्ण नाव माहित नाही रा-११२,११३,११४,सी १/३,पहिला मजला लक्ष्मी टॉवर नानीवाला बाग,आझादपुर आकाश सिनेमा टॉकीजवळ दिल्ली. |
| **फसवणूक र** | | ८,३२,०००/- रू. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील कंपनीचे मालक आरोपीत यांने दिव्यमराठी या वृत्तपत्रामध्ये आकर्षित जाहिरात स्मॉल बिझनेस करा व पैसे कमावा यावर पत्रावळी,द्रोण,कप ,ग्लास असे डिस्पेजेबल साहित्य घरचे घरी बनवा व पैसे कमवा असे देऊन सदरचे मशिनचे तुम्हाला फक्त १० टक्केच रक्कम भरायची आहे उर्वरित ९० टक्के रक्कम आम्ही भरू व तुम्हाला मशिनचा ताबा देवू असे सांगून दि ३१/७/२०२१ ते दि १२/१२/२०२१ रोजी पर्यत वेळोवळी फिर्यादीने त्यांचे अकाऊन्टवर ५,४५,६००/- रूपये भरून व कच्चा मालाचे खरेदीसाठी २,५०,०००/- रूपये रोख रक्कम घेऊन व तसेच मशिनचे ट्रान्सपोर्ट खर्च ३६,४०० असे एकूण ८,३२,०००/- रूपये घेऊन फिर्यादीस सदर मशिन देतो असे सांगून फक्त मशिनचा सांगाडाच देऊन फिर्यादीची फसवणूक केली आहे म्हणून. तपासः- पोसई मोतेकर **८२०८४२५५२१** |